<u>नि.फौ.ख. क्र. १५२/२०२०</u>
<u>निशाणी क्र. १९ सोबत</u>

## <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ ची साक्ष</u>

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | :- | अंकुश दलपतसिंग राजपुत, |
| वय | :- | ४८ वर्ष, |
| व्यवसाय | :- | शेती, |
| राहणार | :- | जनता नगर, ता.शिंदखेडा, जि, धुळे. |

.............................................................................................................

**<u>सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. सी.पी.चव्हाण यांचे मार्फत.</u>**

दि.११.१२.२०१८ रोजी मी माझ्या शेतात होतो. घटना काय घडली याबाबत मला माहिती नाही. मी पोलीस स्टेशनला गेलो नव्हतो. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नव्हता. तसेच घटनेबाबत माझ्याकडे विचारणा केली नव्हती.

***सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासास्वरुप प्रश्न विचारण्याची अनुमती मागीतल्याने अनुमती देण्यात आली.***

हे म्हणणे खरे नाही की, दि.११.१२.२०११ रोजी सकाळी १०.०० वाजता माझे चुलत भाऊ दादाभाई राजपुत हे आशाताई मंगलसिंग राजपुत यांना त्यांचे ओमनी गाडीत आळे ता.शिरपुर येथे सोडण्यासाठी आले होते. हे म्हणणे खरे नाही की,सदर गोष्टीचा राग येवुन आरोपींनी राज बेकरी येथे येवुन सकाळी ०९.३० वाजता मुलगा दिपक अंकुश राजपुत यास वाईट शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी दमदाटी करुन मला डावे फासळी जवळ लोखंडी आर टोचुन मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझा भाऊ दादाभाई राजपुत याला हाताबुक्क्यांनी

मारहाण करुन वाईट वाईट शिवीगाळ केली व जवळच पडलेला दगड उचलुन भावाच्या डोक्याचे मागील बाजुस मारल्याने त्याला दुखापत झाली. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्यासाठी आजरोजी न्यायालयात मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एम.डी. सोनवणे यांनी नाकारला. सबब, उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

**सही/--**
(विनिता आ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) शिंदखेडा

दिनांकः- ०७/०२/२०२६

**–: प्रमाणपत्र :–**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | सचिन अरुण परदेशी |
| न्यायालयाचे नाव | :– | सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,<br>शिंदखेडा, जि. धुळे. |

आदेश अपलोड केलेचा दिनांक:– ०७/०२/२०२६

सही/–––
लघुलेखक, श्रेणी–३
सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा